# भुसावळ नगरपरिषद,भुसावळ

स.सा.स.ठ.नं. १२ दिनांक :- २०-११-२००९

ठराव :- भुसावळ शहरातील विविध भागात दुकान संकुलाचे बाजुच्या मोकळ्या असलेल्या जागा, दुकान संकूलातील टेरेस / जिन्या खालील जागा दुकानासाठी मिळणेबाबत आलेले अर्ज कर अधिक्षक यांचे शिफारसीसह वाचले.

वर नमूद केलेनुसार भुसावळ नगरपरिषद हद्दीत खालील नमूद केलेनुसार दुकानासाठी जागा देणेस या ठरावाव्दारे मंजुरी देण्यात येत आहे.

| जागेचे ठिकाण व वर्णन | जागा मागणी अर्जदाराचे नांव | प्रति माह भाडे |
|---|---|---|
| १) नगरपरिषदेचे तार ऑफीस रोडवरील दक्षिणेकडील दुकान संकूला मधील असलेली मोकळी ६.५० मी.x ३.८८ मी.इतकी मापाची जागा नगरपरिषदेची अटी शर्तीस अधीन राहून देणेस मंजुरी देण्यात येत आहे | सुरेंद्र विरसिंग पाटील, भुसावळ | दरमहा भाडे रु.५००/- |
| २) न.पा.हद्दीतील दगडी पूलाजवळील सुप्रिया ॲटो गॅरेजचे बाजूस असलेली मोकळी जागा रोड पासून ते नाल्याचे काठापर्यतची ३५.x ३० फूट मापाची जागा नगरपरिषदेची अटी शर्तीस अधीन देणेस राहून मंजुरी देण्यात येत आहे | शंकर त्र्यंबक अवधूत, खळवाडी भुसावळ | दरमहा भाडे रु.५००/- |
| ३) न.पा.हद्दीतील शामा मुखर्जी उद्यानाजवळील विश्राम हॉटेलला लागून उत्तरेकडील १० x १२ फूट मापाची जागा नगरपरिषदेची अटी शर्तीस अधीन राहून देणेस मंजुरी देण्यात येत आहे | प्रविण समाधान भालेराव, भुसावळ | दरमहा भाडे रु.४००/- |
| ४) जामनेर रोड पांडूरंग टॉकीज जवळील श्री संत रोहिदास महाराज म्यु.पल मार्केटचे ब विंग मधील पहिल्या मजल्यावरील टेरेसची क्षेत्रफळ ५८३ चौ. प्रमाणे टेरेसची स.सा.स.ठ.नं.७३ दि.९-८-२००० नुसार जागा नगरपरिषदेची अटी शर्तीस अधीन राहून देणेस मंजुरी देण्यात येत आहे | चंद्रशेखर पुरुषोत्तम महाजन भुसावळ | प्रति महाभाडे रु. ८७५/- + सर्व्हीस टॅकस वेगळा व ना परतावा डिपॉझीट रु.२०००००/-(दोन लक्ष) |
| ५) नगरपरिषदेने बांधलेल्या फायर स्टेशन सावित्रीबाई फुले मार्केट चे गाळयापैकी उप मंडळ अभियंता(बाहय विभाग) दुरध्वनी विभाग यांना दिलेल्या गाळयाचे पैकी जिन्या खालील असलेली २२.८ चौमी.मापाची जागा नगरपरिषदेची अटी शर्तीस अधीन राहून मंजुरी देण्यात येत आहे | नितीन मोहन ठाकूर, भुसावळ | मासिक भाडे रु.१००/- प्रमाणे ना परतावा अनामत रक्कम रु.५१०००/- (एकावन्न हजार) मात्र |
| ६) न.पा.हद्दीतील तार ऑफीस रोडवरील दक्षिणेकडील दुकान संकुलाचे कोटेचा मेडीकल जवळील मोकळी १० x १० स्के.फुट जागा नगरपरिषदेचे अटी शर्तीस अधिन राहून देणेस मंजुरी देण्यात येत आहे. | प्रकाश काशिनाथ महाजन, भुसावळ | दरमहा भाडे रु.५००/- |
| ७) न.पा.हद्दीतील तार ऑफीस रोडवरील दक्षिणेकडील दुकान संकुलात निशा जनरल स्टोंअर्स व साई मोबाईल या मधील १३ x १७ स्के.फुट जागा दुकानाकरिता नगरपरिषदेचे अटी शर्तीस अधिन राहून देणेस मंजुरी देण्यात येत आहे. | राजेश शंकर बटवा, भुसावळ | दरमहा भाडे रु.५००/- |

सूचक :- श्री.आवटे राजेंद्र दत्तू
अनुमोदक :- श्री.बारसे संतोष मोहन
ठराव बहुमताने मंजूर.
खरी नक्कल

मुख्याधिकारी,
भुसावळ नगरपरिषद भुसावळ करिता.

# भुसावळ नगरपरिषद, भुसावळ

**स.सा.स.ठ.नं. २१** दिनांक :- १५-१२-२०१०

ठराव :- भुसावळ नगरपरिषदेचे स्व.छबीलदास चौधरी म्यु.शॉपींग कॉम्प्लेक्स मधील पहिल्या मजल्यावरील रिकामी असलेली जागा व्यवसायासाठी मिळणेबाबत श्री.घनश्यामदास भगवानदास बठेजा रा.भुसावळ यांचा अर्ज तसेच आरक्षण क्र.६९ मधील जामनेर रोड लगत असलेल्या दुकान संकुलनातील दुकान क्र.२७ ते ३८ या दुकानाचे टेरेसची जागा लॉजींग बोर्डींग व हॉटेल व्यवसाय करणेकरिता रिकामी जागा मिळणे बाबत श्री.बाबुखॉन मजिदखान यांचे अर्जावरील रिपोर्ट वाचला.

कार्यालयीन अहवालात नमूद केलेनुसार भुसावळ नगरपरिषदेने शहरातील बेरोजगार तरुणाना रोजगार उपलब्ध व्हावा यादृष्टीने शहरात स्व. छबीलदास चौधरी म्युनिसपल शॉपींग कॉम्प्लेक्स बांधलेले असून याठिकाणी अर्जदार श्री.घनश्यामदास भगवानदास बठेजा यांचे नावे गाळा क्र.६६ मध्ये ते व्यवसाय करीत आहे. सदरचे दुकाना शेजारी रिकामी जागा असून त्या ठिकाणी नागरिक व दुकान संकुलातील दुकानदार तेथे दररोज घाण करीत असतात त्यामुळे दुर्गधी पसरुन दुकानदार व नागरिक यांचे आरोग्यास धोका होण्याचा संभव असल्यामुळे सदरची रिकामी जागा अर्जदार यांनी मिळणेबाबत मागणी केलेली आहे. सबब सदरची जागा अर्जदार यांना उपलब्ध करुन दिल्यास ते त्याठिकाणी स्वखर्चाने मोकळया जागेत बांधकाम करणेस तयार आहे.तसेच त्या जागेपोटी डिपॉझीट रक्कम रु.५००००/- मात्र व नगरपालिका भाडे रकम रु.२००/- मात्र देण्यास तयार आहे. त्यामुळे नगरपरिषदेस आर्थिक उत्पन्न मिळू शकेल असे या सभेचे मत आहे.

याबाबीचा विचार करता भुसावळ नगरपरिषदेचे स्व.छबीलदास चौधरी म्यु.शॉपींग कॉम्प्लेक्स मधील पहिल्या मजल्यावरील रिकामी असलेली जागा श्री.घनश्यामदास भगवानदास बठेजा भुसावळ यांना देणेस ही सभा मान्यता देत आहे. मात्र नगरपरिषदेचे नियमानुसार डिपॉझीट व सर्व कर अर्जदार यांना वेळोवेळी भरावे लागतील. यास ही सभा मंजुरी देत आहे.

तसेच जामनेर रोडवरील आरक्षण क्र.६९ दुकान संकुलनातील दुकान नं.२७ ते ३८ दुकानावरील टेरेस आजरोजी रिकामे असून बेरोजगार लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने या टेरेस वरील जागा लॉजींग बोर्डींग व हॉटेल या प्रयोजनासाठी अर्जदार श्री.बाबुखान मजिदखान यांनी मागणी केलेनुसार दिल्यास त्यांचा व्यवसाय सुरु होऊन त्याठिकाणी होणारी घाण होणार नाही. बेकारी दुर होईल व नगरपरिषदेच्या उत्पन्नात वाढ होईल. अर्जदार हे स्वतः व्यवसायासाठी लागणारे बांधकाम एकूण क्षेत्र ४०६८ चौ.फुट स्वखर्चाने करणेस तयार आहे. त्यामुळे नगरपरिषदेस खर्च करणेची आवश्यकता नाही असेया सभेचे मत झाले आहे.

तरी जामनेर रोडवरील दुकान संकुलनातील दुकान नं.२७ ते ३८ टेरेस करिता डिपॉझीट रु. २ लक्ष मात्र व दरमहा भाडे रु.६१००/- घेणेस व स.सा.स.ठ.नं.७३ दि.९-८-२००० नुसार अटी शर्तीचे अधीन राहून ही सभा मान्यता देत आहे. वर नमूद केलेनुसार डिपॉ.भाडे नियमीत भरणा करुन घ्यावा व याकरिता लागणारे स्टॅम्पपेपर,कागदपत्रांची पुर्तता सबंधीताकडून करुन घ्येण्यात यावी.

तसेच अर्जदार ॲड.श्री.दिलीप दौलत संसारे(अध्यक्ष) नियोजित ॲडव्होकेट फर्म फॅार सोशल जस्टीस भुसावळ यांनी द.शि.विद्यालय जवळील म.गांधी म्यु.मार्केट पहिल्या मजला दुकानावरील टेरेस वकीलांचे ऑफीस कामासाठी मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

पूर्वी काढलेल्या जाहिरात मध्ये या टेरेसचा समावेश नसून आज पर्यत द.शि.विद्यालय जवळील म.गांधी म्यु.मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील टेरेसची कोणत्याही व्यवसाईकाने मागणी केलेली नाही. ते टेरेस रिकामे पडून आहे. तरी म.वकील सो.यांनी नगरपरिषदेकडे त्या टेरेसची मागणी केलेली असून त्यांना पूर्वी काढलेल्या जाहिरातीप्रमाणे अटी व शर्ती लागू करुन देण्यात हरकत नाही. ते टेरेस ४३६२ चौ. फुट असून टेरेसचे ना परतावा डिपॅाझीट रकम रु.२,००,०००/- मात्र आहे व १.५० प्रमाणे ४३६२ चौ.फुटचे दरमहा भाडे रु.६५४३/- व मालमत्ता कर भरावा लागेल.सदरील टेरेसचे बांधकाम हे वकीलांनी आपले स्वखर्चाने करावयाचे आहे. रिकामे पडून असलेले टेरेस भाडे तत्वावर दिल्यास नगरपरिषदेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यास मदत होईल. असे सभेचे मत आहे व स.सा.स.ठ.नं.७३ दि.९-८-२००० नुसार अटी शर्तीस अधीन राहुन सदरील टेरेस देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

तसेच श्री.गिरीश गोपाळ पोतदार यांना पूर्वी काढलेल्या जाहिरातीनुसार जामनेर रोडवरील फायर फायटर जवळ तळ मजला दुकान नं.१३ ते १८ वरील १९०० चौ. फुट टेरेस ना परतावा डिपॅाझीट रकम रु.२,००,०००/- व रु.१-५० प्रति चौ.फूट प्रमाणे दरमहाचे भाडे रु.२९००/- व त्यावर होणारा मालमत्ता करांची रकम भरावी लागेल. स.सा.स.ठ.नं.७३ दि.९-८-२००० नुसार अटी शर्तीचे अधीन राहून ही सभा मान्यता देत आहे.

तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील टेरेस बाबत पूर्वी काढलेली जाहीरात प्रथम या प्रथम घ्या मध्ये कोणतेही अर्ज प्राप्त न झाल्यामुळे सदरील टेरेस आज अखेर रिकामे पडून आहे. त्या टेरेस मागणी बाबत अर्जदार संदेश दुर्गाप्रसाद शुक्ला यांनी मागणी केलेली आहे. तरी त्यांना खालील नमूद केलेप्रमाणे श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील टेरेस भाडें तत्वावर देण्यास व वि.स.ठ.नं.१५ दि.२०-५-२००३ या ठरावात दिलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून ही सभा मंजुरी देत आहे.

१) श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील दुकान नं.१ व २४ ते ३१ व दुकान ४९ ते ५४ असे एकूण ४००० चौ.फुट टेरेस ना परतावा डिपॅाझीट रकम रु.२,००,०००/- व रु.१-०० प्रति चौ.फुट प्रमाणे दरमहा भाडे रु.४०००/- व त्यावरील मालमत्ता करही भरावा लागेल.

२) श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील दुकान नं.३२ व ३७ ते ३१ व दुकान ४३ ते ४८ असे एकूण ३०३९ चौ.फुट टेरेस ना परतावा डिपॅाझीट रकम रु.२,००,०००/- व रु.१-०० प्रति चौ.फुट प्रमाणे दरमहा भाडे रु.३०३९/- व त्यावरील मालमत्ता करही भरावा लागेल.

३) श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट मधील पहिल्या मजल्यावरील दुकान नं.२ ते १० व दुकान १८ ते २३ असे एकूण ३६०० चौ.फुट टेरेस ना परतावा डिपॅाझीट रकम रु.२,००,०००/- व रु.१-०० प्रति चौ.फुट प्रमाणे दरमहा भाडे रु.३६००/- व त्यावरील मालमत्ता करही भरावा लागेल.

रिकामे पडून असलेले टेरेस हे भाडे तत्वावर दि./ल्यास नगरपरिषदेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यास मदत होईल असे सभेचे मत आहे.

तसेच सभेचे सुरुवातीपासून दोन्ही हात जोडून विनंती करणारे श्री.विष्णू भगवान वारके व किशोर वाघनाथ भालेराव यांनी दुकान संकुलामधील जिन्याखालील असलेली रिकामी जागा दुकान लावणेसाठी मागणी केलेली आहे.

तरी नगरपरिषद दुकान संकुलाजवळ अतिक्रमण होऊ नये या दृष्टीकोनातून श्री.विष्णू भगवान वारके यांना फायर स्टेशन जवळील जिन्या खालील जागा ना परतावा डिपॅाझीट रकम रु.३००००/- व दरमहा भाडे रु.१००/- प्रमाणे व त्यावरील मालमत्ता कर ही भरावा लागेल.

तसेच श्री.किशोर वाघनाथ भालेराव यांना श्री सरदार वल्लभभाई पटेल अ विंग मधील तळ मजला जिन्या खालील जागा ना परतावा डिपॅाझीट रकम रु.२५०००/- व दरमहा भाडे रु.१००/- प्रमाणे व त्यावरील मालमत्ता कर ही भरावा लागेल.

नगरपरिषद वेळोवेळी ज्या अटी/शर्ती लागू करीन त्या टेरेस व जागा धारकावर बंधनकारक राहील. त्यातील कोणत्याही शर्तीचा भग केल्यास करारनामा रद्द केला जावून त्याचे परिणामाची जबाबदारी टेरेस जागा धारकावर राहील. तसेच जरुर त्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

सदरील टेरेसचे भाडे पट्टयाचे संदर्भात करारनामा करणेचा अधिकार भुसावळ नगरपरिषदेस महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम २७२ नुसार असून त्यातील कायद्याचे तरतुदीप्रमाणे हक्क व जबाबदाऱ्या स्विकारण्यात आल्या आहेत व वरील टेरेस व जागा देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सूचक :-** श्री.शेख शाकीर सरदार
**अनुमोदकः-** श्री. चंदन मोहनलाल रामचरण
ठराव बहुमताने मंजूर
खरी नक्कल

मुख्याधिकारी,
नगरपरिषद भुसावळकरिता

# भुसावळ नगरपरिषद,भुसावळ

**स्था.स.ठ.नं. २१** **दिनांक :- ११-१०-२०१२**

**ठराव :-** अध्यक्ष,एकता महिला बचत गट,भुसावळ यांचा भुसावळ नगरपरिषदेच्या डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यानात उपहार गृह व माफक दरात पुरी भाजीकेंद्र उभारणेसाठी जागा उपलब्ध करुन देणे बाबतचा अर्ज कार्यालयीन अहवालासह वाचला.

कार्यालयीन अहवालात नमूद केलेनुसार डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यानात शहरातील नागारिकांची व लहान मुलांची मोठया प्रमाणात वर्दळ असते तसेच सदर उद्याना जवळ तहसिल कचेरी, पोलीस स्टेशन, न्यायालय इत्यादी कार्यालय असल्याने तेथे दिवसभर नागरिकांची येजा सुरु असते त्यांना चहापाणी नास्ता व जेवणाची सोय होण्यासाठी माफक दरात पुरीभाजी केंद्र व उपहारगृह सुरु केल्यास नागरिकाची चांगल्या प्रकारे सोय होवू शकेल. सबब सौ.किर्ती राजेश सोनार अध्यक्ष,एकता महिला बचत गट,भुसावळ यांना भुसावळ नगरपरिषदेच्या डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यानात उपहार गृह व माफक दरात पुरी भाजीकेंद्र उभारणेसाठी १० बाय १० फुट या मापाची सार्वजनिक वाचनालयाचे मागील बाजुस असलेली मोकळी जागा दरमहा रु.१५०/- भाडयाने देणेस या ठरावाव्दारे मंजुरी देण्यात येत असून अधिनियमातील तरतुदीनुसार जागा भाडयाने देणेची कार्यवाही करणेसही या ठरावाव्दारे मंजुरी देण्यात येत आहे. सदर पुरी भाजी केद्र सुरु करताना तेथील सांडपाण्याची सोय एकता महिला बचत गटास स्वखर्चाने करावी लागेल. तसेच सदरचे सांडपाणी उद्यानात इतरत्र जावून घाण होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल व केंद्रातील करकचरा व्यवस्थीत निचरा होईल व दररोज साफसफाई करण्याची काळजी घ्यावी. उद्यानात येणाऱ्या नागरिक व लहान मुलाना केद्रामुळे कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सूचक :- श्री.शेख जाकीर सरदार
अनुमोदक :- श्री.आवटे राजेंद्र दत्तू
ठराव बहुमताने मंजूर.

खरी नक्कल

मुख्याधिकारी,
भुसावळ नगरपरिषद भुसावळ करिता.

# *भुसावळ नगरपरिषद,भुसावळ*

**स्था.स.ठ.नं. १४** **दिनांक :- ३.३.२०१४**

**ठराव :-** भुसावळ नगरपरिषदेचे आस्थापनेवरील विधी व कामगार पर्यवेक्षक या पदावर श्री.अनिलकुमार चंद्रलाल आहुजा हे कार्यरत असून त्यांचेवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७९ (२) (२) अन्वये कारवाई करणे बाबतचा म.अध्यक्ष, नगरपरिषद भुसावळ यांचा दि.१.३.२०१४ चा अहवाल वांचला.

म.अध्यक्ष, नगरपरिषद भुसावळ यांचा दि.१.३.२०१४ चा अहवाल मंजुर. त्यात नमूद केलेनुसार भुसावळ नगरपरिषदेचे विविध विभागातील विषयाबाबत शहरातील नागरीक विविध न्यायालयात केसेस दाखल करीत असतात. संबंधित कर्मचाऱ्यास केसेस बाबत माहिती विचारली असता ते योग्य माहिती न देता उडवाउडवीचे उत्तरे देत असतात. तसेच सदर केसेससाठी नियुक्त केलेल्या विधी तज्ञ (ॲडव्होकेट) यांना सुध्दा केसेस बाबत योग्य माहिती व कागदपत्रे मुदतीत देत नसतात त्यामुळे संबंधित विधी तज्ञ म.अध्यक्ष, नगरपरिषद यांचकडेस भ्रमणध्वनीद्वारे व प्रत्यक्ष भेटून तक्रार करीत असतात. विधी तज्ञांना वेळेचे आंत कागदपत्रे व माहिती न मिळाल्यामुळे बहुतेक केसेसमध्ये नगरपरिषदेच्या विरुध्द निकाल लागलेले आहेत. त्यामुळे नगरपरिषदेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याच्या बेजबाबदार वर्तणुकीने केसेसचे निकाल नगरपरिषदेच्या विरोधात लागल्यामुळे नगरपरिषदेचे कामकाजाचे प्रक्रिया तसेच विकासात्मक कामे रखडलेली आहेत. त्यामुळे शहरातील नागरीक व सन्माननीय नगरसेवक नाराज आहेत.

सबब श्री.अनिलकुमार चंद्रलाल, विधी व कामगार पर्यवेक्षक यांच्या वर्तणुकी मुळे विविध विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी त्यांची असलेली चुकीची वागणूक यामुळे ते कार्यरत असलेले पदाची जबाबदारी योग्य प्रमाणे न सांभाळता त्यांचे कर्तव्यात कसूर केल्याचे निदर्शनास येत आहे. सबब श्री.अनिलकुमार चंद्रलाल, विधी व कामगार पर्यवेक्षक यांचे विरुध्द महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७९ (२) (२) अन्वये कारवाई करणेबाबत म.जिल्हाधिकारी, जळगाव यांचकडे प्रस्ताव सादर करणेस व सदरचे प्रस्तावावर सही करणेचा अधिकार म.अध्यक्ष, नगरपरिषद भुसावळ यांना या ठरावाद्वारे देण्यात येत आहे.

सूचक :- श्री.शे.मुस्ताक मुसा
अनुमोदक :- श्री.अ.अ.आरीफ अ.गनी
ठराव सर्वानुमते मंजूर.

**खरी नक्कल**

सही /- xxx
सभापती,
स्थायी समिती,
भुसावळ नगरपरिषद भुसावळ

मुख्याधिकारी,
भुसावळ नगरपरिषद भुसावळ करिता.